N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
**प्रथम खबर अहवाल**
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** बुलढाणा **P.S.(ठाणे):** धाड
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0132 **Year (वर्ष):** 2023
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**12/05/2023 01:55

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 11/05/2023
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 11/05/2023
**Time From (वेळेपासून):** 15:55 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:55 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 12/05/2023 **Time (वेळ):** 01:40 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 002
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 12/05/2023 01:40 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 09 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** चांडोळ

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) Name (नाव): संजय मन्नुसिंग ब्राम्हणे

(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :

(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष): 1981

(d) Nationality (राष्ट्रीयत्व): भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No.(पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | चांडोळ,धाड,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | चांडोळ,धाड,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.):

Mobile (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | राजेश मधुकर मानकर | | | 1. बुलढाण,धाड,बुलढाणा,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

वेळेवर

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रु दाराच्या 6 नोटा | 3,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

3,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., If any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

समक्ष हजर येवुन तकार देतो की मी वरीलप्रमाणे असुन वर नमुद पत्त्यावर कुटूंबासह राहतो व शेतीचा व्यवसाय करतो मी दिनांक 11-05-2023 रोजी श्री संजय चौधरी पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो बुलडाणा यांना माझा मित्र नामे प्रल्हाद फुलसिंग उसारे याच्या मोबाईल वरून फोन करुन माहीती दिली की माझ्या व माझ्या पत्नीविरुध्द पोलीस स्टेशन धाड येथे एनसी केस रजीस्टर असून सदर केसमध्ये आमचे गावचे बिट जमादार श्री राजेश मानकर हे मला माझे पत्नीचे नाव कमी करुन कोणतीही कार्यवाही न करण्यासाठी 5000/- रुपये लाचेची मागणी करीत आहेत. सदर तक्रारीवरुन आज दिनांक 11-05-2023 रोजी आगार व्यवस्थापक राज्य परीवहन महामंडळ, बुलढाणा यांचे कार्यालयातील दोन शासकीय कर्मचारी पंच म्हणुन उपलब्ध करुन घेवुन पोलीस उपअधिक्षक श्री चौधरी साहेब, सापळा पथक तसेच दोन्ही पंच असे खाजगी वाहनाने ग्राम धाड येथील करडी फाटयावर हजर आले. त्यावेळी मी सुध्दा ठरल्याप्रमाणे करडी फाटयावर कार्यवाही पथकाजवळ हजर आलो. त्यावेळी पोलीस उपअधिक्षक चौधरी साहेब यांनी मला त्यांचा तसेच कार्यवाही पथकातील सदस्यांचा व पंचाचा परीचय करुन दिला. त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री चौधरी साहेब यांनी माझी लेखी तकार घेतली ती पुढीलप्रमाणे. दिनांक 01.05.2023 रोजी माझे चुलत भावाची पत्नी नामे श्रीमती प्रभाबाई पुनिलाल ब्राम्हणे हिच्याशी आमचा किरकोळ वाद झाला होता त्याबाबत सौ प्रभाबाई पुनिलाल ब्राम्हणे हिने माझा तसेच माझी पत्नी सौ संगीता संजय ब्राम्हणे असे आम्हा दोघा पती-पत्नीचे नावाचा पोलीस स्टेशन धाड येथे रिपोर्ट दिला होता त्यावरुन आमचे विरुध्द एन सी केस रजीस्टर असून सदर एन सी केसची चौकशी आमचे गावचे बिट जमादार श्री राजेश मानकर यांचेकडे आहे.दिनांक 08.05.2023 रोजी मी घरी हजर असतांना मला आमचे बिट जमादार श्री राजेश मानकर यांचा फोन आला व त्यांनी मला तुमच्या विरुध्द पोलीस स्टेशन धाड येथे रिपोर्ट दाखल झालेला असून त्यासंबधाने तुम्ही पोलीस स्टेशन धाड येथे भेटण्यासाठी या असे सांगीतले. त्यावरुन मी दिनांक 08.05.2023 रोजी पोलीस स्टेशन धाड येथे जावून बिट जमादार श्री मानकर साहेब यांची भेट घेतली असता त्यांनी मला आमचे विरुध्द दाखल एन सी केसबाबत माहीती देवून सदर केसमधून माझी पत्नी सौ संगीता ब्राम्हणे हिचे नाव कमी करुन प्रतिबंधक कार्यवाही न करण्यासाठी 5000/- रुपये दया असे म्हणून बिट जमादार मानकर साहेब यांनी पाच हजार रुपये लाचेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना माझेजवळ सध्या पैसे नाही मी पैश्याची व्यवस्था करुन तुम्हाला भेटतो असे सांगून तेथून निघून आलो होतो परंतु बिट जमादार हे मला वारंवार फोन करुन 5000/- रुपये घेवून येण्यासाठी तगादा लावत आहे. बिट जमादार श्री राजेश मानकर यांनी आज दिनांक 11.05.2023 रोजी सुध्दा मला फोन करुन लाच रक्कम घेवून पोलीस स्टेशन धाड येथे बोलाविलेले आहे तरी मला त्यांना लाच रक्कम देण्याची मुळीच इच्छा नाही बिट जमादार मानकर यांनी मागणी केलेली 5000/- रक्कम ही कोणतीही शासकीय फि नसुन त्यांचेत व माझेत कोणताही आर्थिक देवान घेवानीचा व्यवहार नाही तसेच आमचा आपसात कोणताही वैर वाद नाही.तरी लोकसेवक श्री राजेश मानकर, हेड कॉन्स्टेबल पोलीस स्टेशन धाड जि बुलढाणा यांना माझेकडुन 5000/- रुपये लाचेची रक्कम स्विकारतांना पकडुन कायदेशिर कार्यवाही करावी ही विनती.

वरीलप्रमाणे लेखी दिलेली तकार दोन्ही पंचाना वाचण्यास दिली व माझेकडुन तोंडी कथन करण्यात आली त्यानंतर पंच क 1 श्री पुंजाजी गवई यांनी त्यावर त्यांचे स्वहस्ताक्षरात शेरा मारुन दोन्ही पंचानी त्यावर सहया केल्या आहेत त्यानंतर श्री चौधरी साहेब यांनी ग्राम धाड येथील करडी फाटयावर खाजगी कार क्रमांक MH-28 AZ-0824 मध्ये दोन्ही पंचाना तसेच मला पडताळणी पुर्व पंचनाम्याप्रमाणे सुचना देवुन सोबत आणलेल्या व्हॉईस रेकॉर्डर बाबत सविस्तर माहीती दिली त्याबाबतचा सविस्तर पडताळणी पूर्व पंचनामा करण्यात आला आहे. पडताळणी पुर्व पंचनामा कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर मी दिलेल्या तक्रारीनुसार यातील लोकसेवक श्री मानकर बिट जमादार यांची लाच मागणी आहे किंवा कसे याबाबत लाच मागणी पडताळणी कार्यवाही करणे असल्याने पोलीस उपअधिक्षक श्री चौधरी साहेब यांनी माझेकडे व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन देवुन मला व पंच क 1 श्री गवई यांना मी आणलेली माझी खाजगी मो.सा

क्रमांक एम एच 21 बि.ए 7794 हिने 10.42 वा पोलीस स्टेशन धाडकडे रवाना केले. त्यावेळी मी व पंचक 1 श्री पुंजाजी गवई असे आम्ही दोघे माझे मोटार सायकलने करडी फाटयावरुन पोलीस स्टेशन धाडकडे रवाना होवून पोलीस स्टेशन धाडचे आवारात पोहचलो. त्यावेळी मी लोकसेवक मानकर यांना फोन करुन पोलीस स्टेशन येथे आलो असल्याबाबत माहीती दिली. त्यावेळी लोकसेवक श्री मानकर हे मला म्हणाले की आलोच मी असे म्हणून थोडयाच वेळात बिट जमादार मानकर हे आमचे जवळ आले. त्यावेळी त्यांनी माझेसोबत असलेल्या पंचाबाबत विचारणा केली असता मी त्यांना ते माझे सादमाऊ असल्याबाबत सांगीतले. त्यानंतर मानकर साहेब व आम्ही असे पोलीस स्टेशन समोर असलेल्या एका हॉटेलवर चहा घेण्यासाठी गेलो त्यावेळी आमच्यामध्ये दाखल अदखलपात्र गुन्हयातुन माझे पत्नीचे नाव कमी करुन कोणतीही कार्यवाही न करण्यासंबधी बोलणी झाली झालेल्या बोलणी दरम्यान मी लोकसेवक मानकर यांना म्हणालो की मंग साहेब माझ बी नाव निघत का? तकारीतून त्यावेळी लोकसेवक मानकर म्हणाले की येवढं आता काय मले बी नोकरी करु देता की नाही तुम्ही? यांच्या दोघा नवरा बायकोच नाव आहे. बाईच नाव मी महया रिस्कवर काढुन घेतल मग आता का बाया मानसाले कुठ कोर्ट कचेरीत पाठवता? हे म्हणता माझ पण नाव काढा साधी केस आहे ती 107 ची त्यात काय होवू राहील. त्यावेळी मी त्यांना म्हणालो की माझ्या साढूनीच मला दोन हजार दिले आता अन तिन हजार मला जरा थांबून एका घटयात देवून राहीले ते अर्ध्या एका तासात मग अर्ध्या एक तासात पुर्ण देतो तुम्हाला मी त्यावेळी लोकसेवक मानकर म्हणाले की देवून देन देवून देन त्यावेळी मी मानकर साहेब यांना म्हणालो की अर्ध्या एक तासात पुर्ण देतो न तुम्हाला त्यावेळी मानकर साहेब म्हणाले की किती आहे आता आता किती हे त्यावेळी मी लोकसेवक मानकर यांना म्हणालो की दोन हजार त्यावेळी लोकसेवक मानकर यांनी हाताने इशारा करुन दोन हजार रुपये देण्यास सांगीतले असता मी पंच क 1 यांचे समक्ष 2000/- रुपये लोकसेवक मानकर हेडकॉन्स्टेबल यांना दिले त्यानंतर आम्ही चहाचे हॉटेलमधून बाहेर पडलो अश्याप्रकारे लोकसवेक राजेश मानकर, पोलीस हेडकॉन्स्टेबल यांनी माझेकडुन लाचमागणी पडताळणी कार्यवाही दरम्यानच पंच क 1 श्री गवई याचेसमक्ष 2000/- रुपये स्विकारुन उर्वरीत 3000/- रुपये स्विकारण्यास सहमती दर्शविल्याने मी व पंच क 1 श्री गवई असे कार्यवाही पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. त्यावेळी पोलीस उपअधिक्षक श्री चौधरी साहेब व सापळा पथकातील सदस्यांनी सदर व्हॉईस रेकॉर्डर मधील झालेले संभाषन एकुण लोकसेवक श्री राजेश मानकर पोलीस हेडकॉन्स्टेबल पोलीस स्टेशन धाड यांनी मला माझे व माझे पत्नी विरुध्द पोलीस स्टेशन धाड येथे दाखल असलेल्या एन सी केस मधून माझे पत्नी सौ संगीता ब्राम्हणे हिचे नाव कमी करुन प्रतिबंधक कार्यवाही न करण्यासाठी लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान 2000/- रुपये पंच क 1 यांचेसमक्ष स्विकारुन उर्वरीत 3000/- रुपये लाचेची रक्कम स्विकारण्यास संमत्ती दर्शविल्याचे पडताळणी कार्यवाही संभाषणावरुन द पंच क्रमांक 1 श्री गवई यांचे सांगणेवरुन निष्पन्न झाले. त्यावेळी चौधरी साहेब यानी मला खाजगी वाहनात बसावुन घेवुन लोकसेवक श्री राजेश मानकर, पोलीस हेडकॉन्स्टेबल यांनी मागणी केल्याप्रमाणे त्यांना उर्वरीत लाच रक्कम देण्यासाठी 3000/- रुपये हजर करण्यास सांगीतले असता मी माझेजवळील पाचशे रुपये दराच्या सहा नोटा असे एकुण 3000/- रुपये चौधरी साहेब यांचेकडे हजर केले श्री चौधरी साहेब यांनी सापळा पथकातील सदस्यांचे मदतीने सदर नोटांचे कमांक लिहुन घेवुन सदर नोटाना अॅन्थ्रासिन पावडर लावण्याची प्रकीया पुर्ण करुन मला तसेच पंच क 1 श्री पुंजाजी गवई यांना सापळा कार्यवाही बाबतच्या सविस्तर सुचना दिल्या त्यानंतर पोलीस उपअधिक्षक चौधरी साहेब यांचे सुचनेवरुन नापोका विनोद लोखंडे यांनी लाचेची रक्कम माझे हिरवट रंगाचे शर्टाचे डाव्या बाजुचे छातीवरील खिश्यात ठेवून दिली त्याबाबतचा सविस्तर सापळा पूर्व पंचनामा करण्यात आला आहे त्यानंतर आपण दिलेल्या सुचनेवरुन मी लोकसेवक श्री राजेश मानकर यांना फोन करुन लाच रक्कम घेवून कोठे येवू याबाबत विचारणा केली असता लोकसेवक श्री मानकर यांनी मला तुम्ही चांडोळ येथे जा मी चांडोळ येथे आल्यावर तुम्हाला फोन करतो असे सांगीतल्याने आपण सर्वानुमते चांडोळ येथे जावून लोकसेवक मानकर फोन करतील त्याप्रमाणे पुढील सापळा कार्यवाही आयोजीत करण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार पोलीस उपअधिक्षक श्री चौधरी साहेब व सापळा पथक असे त्यांचे खाजगी वाहनाने व मी माझे मोटार सायकलने ग्राम चांडोळ शिवारातील भारज फाटयावर पोहचून लोकसेवक श्री मानकर यांचे फोनची वाट पाहत थांबून राहीलो त्यानंतर चांडोळ शिवारातील भारज फाटयावर थांबून असतांना 15.38 वा दरम्यान लोकसेवक श्री राजेश मानकर यांचा फोन आला व त्यांनी मला लाचेची रक्कम घेवून चांडोळ येथील पोलीस चौकीवर बोलाविल्याने आपण सर्वानुमते चांडोळ येथील पोलीस चौकी येथे सापळा कार्यवाही आयोजीत करण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार पोलीस उपअधिक्षक श्री चौधरी साहेब यांनी माझेकडे व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन देवुन मला व पंच क 1 श्री गवई यांना मी आणलेल्या माझे खाजगी मोटार सायकलने चांडोळ येथील पोलीस चौकीकडे रवाना केले. त्यावेळी पोलीस उपअधिक्षक श्री चौधरी साहेब सापळा पथक तसेच पंच क 2 असे खाजगी वाहनाने चांडोळ येथील पोलीस चौकीकडे आमचे पाठोपाठ रवाना झाले. त्यावेळी सापळा पथक चांडोळ येथील पोलीस चौकीचे थोडे अलीकडे खाजगी वाहनातुन उतरुन जवळच असलेल्या

पोलीस चौकीचे आजुबाजुला त्यांचे अस्तीत्व लपवुन उभे राहील्याची खात्री झाल्यानंतर मी व पंच क 1 पुंजाजी गवई असे आम्ही पोलीस चौकीचे आत मध्ये गेलो असता लोकसेवक श्री राजेश मानकर हे चौकीमध्ये खुर्चीवर बसलेले होते त्यावेळी आम्ही त्यांचेजवळ जावून त्यांचेशी मी आनचे विरुद्ध दाखल असलेल्या अदखलपात्र गुन्ह्यातून पत्नीचे नाव कमी करण्यासंबंधी चर्चा केली,त्यावेळी लोकसेवक श्री राजेश मानकर यांनी हाताचे बोटे हलवून पैसे देण्याबाबत इशारा केला असता मी माझे शर्टाचे खिशयातील लाचेची उर्वरीत रक्कम 3000/- रुपये काढून त्यांना म्हणालो की सकाळी 2000/- रुपये दिले व आता हे तीन हजार रुपये देतो असे म्हणून लाचेची रक्कम तीन हजार त्यांचे समोर धरली असता लोकसेवक मानकर बिट जमादार यांनी सदर लाच रक्कम त्यांचे उजव्या हाताने स्विकारुन नेसल्या खाकी रंगाचे पोलीस वर्दीचे पॅन्टचे उजव्या बाजूस असलेल्या मागील खिश्यात ठेवून दिले. त्यावेळी मी माझे डोक्याला गुंडाळलेला रुमाल हातात धरुन लाच स्विकारल्याबाबतचा नियोजीत इशारा करताच पोलीस उपअधिक्षक चौधरी साहेब व सापळा पथकातील कर्मचारी तसेच पंच क .2 श्रीमती कल्पना जाधव असे आमचे जवळ आले त्यावेळी आपण लोकसेवक मानकर यांना लाचेची रक्कम कोठे ठेवली याबाबत विचारणा केली असता, लोकसेवक मानकर यांनी त्यांचे खाकी रंगाचे पोलीस वर्दीचे पॅन्टचे उजव्या बाजूस असलेल्या मागील खिश्यातुन लाचेची रक्कम काढून हातात घेतली असता आपण दिलेल्या सुचनेपरुन पंचक 1 श्री गवई यांना सदर रक्कम ताब्यात घेतली सदर रक्कमेमध्ये 500/- रुपये दराच्या 06 नोटा असे एकुण 3000/- रुपये असल्याची सांगीतले त्यावेळी लाचेच्या रक्कमेचे क्रमाक व पंच क 2 श्रीमती जाधव यांचेकडे नोंद करुन ठेवलेले नोटाचे क्रमांक हे एकच असल्याची खात्री केली त्यानंतर चौधरी साहेब यांनी पोलीस चौकीतील खिडक्या व दरवाजे बंद करुन कृत्रीम अंधारात लोकसेवक मानकर व माझे हातावर तसेच लाच रक्कमेवर अल्ट्राव्हायलेट बॅटरीचा उजेड लावून अॅन्थ्रासिन पावडरची चकाकी असल्याबाबतची पंचाना खात्री करुन दिली. त्यानंतर चौधरी साहेब यांनी माझे गळ्यातील व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेवून बंद केले.त्यानंतर श्री चौधरी साहेब या

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Manish Subhashrao Gawande(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

1508
ठाणे अंमलदार
पोलीस स्टेशन धाड

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Manish Subhashrao
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**